# लोकशाही आणि विविधता

**प्र.२. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**समाजातील वेगळेपणा / विविधता**

**१. समाजात वेगळेपणा निर्माण करणाऱ्या जन्मजात वैशिष्ट्यांची / घटकांची नावे लिहा.**

**उत्तर:** भाषा, प्रदेश, देश व स्त्री-पुरुष विभागणी हे जन्मावर ठरणारे, वेगळेपणा निर्माण करणारे मुख्य घटक आहेत.

**२. भाषेच्या बाबतीत एखादा समाज एकसंध आहे हे आपण केव्हा म्हणू शकतो?**

**उत्तर:** अवाढव्य अशा भूप्रदेशावर पसरलेल्या एखाद्या समाजाची भाषा एकच असते त्यावेळी तो समाज भाषेच्या बाबतीत एकसंध असतो. उदा. अवाढव्य भूप्रदेशावर पसरलेल्या चीनमधील लोक फक्त चिनी भाषाच बोलतात.

**३. बहुभाषिक समाज म्हणजे काय?**

**उत्तर:** ज्या समाजात एकापेक्षा जास्त भाषा बोलणारे लोक असतात, त्या समाजाला बहुभाषिक समाज असे म्हणतात.

## विविधता आणि एकता

**४. भारतीय समाजामध्ये कोणत्या बाबतीत विविधता आढळते?**

**उत्तर:** भारतीय समाजामध्ये भाषा, प्रदेश, धर्म व पंथ यांमध्ये विविधता आढळून येते.

## विविधता आणि लोकशाही राजकारण

**५. लोकशाही व विविधतेविषयी काय समजूत आहे?**

**उत्तर:** लोकशाही असेल, तर विविधतेचे संरक्षण होते व लोकशाही असलेला समाज जास्त यशस्वीपणे विविधता हाताळू शकतो, अशी समजूत आहे.

**६. लोकशाहीत विविधता असताना वेगवेगळे राजकीय गट कसे निर्माण होतात?**

**उत्तर:** लोकशाहीत जेव्हा विविधता असते, तेव्हा त्या विविधतेनुसार धर्म, भाषा किंवा प्रदेशाच्या आधारावर राजकीय गट निर्माण होतात.

## विविधता आणि विषमता

**७. लोकशाहीपुढील मुख्य प्रश्न काय असतो?**

**उत्तर:** विविधता असूनही सर्व समूहांचे संबंध समानतेचे आणि सलोख्याचे राहतील याची दक्षता कशी घ्यायची हा लोकशाहीपुढील मुख्य प्रश्न असतो.

## जातींची विविधता

**८. जातीभेदविरोधी चळवळीचा मुख्य रोख काय होता?**

**उत्तर:** जातीभेदविरोधी चळवळीचा मुख्य रोख जातीप्रथेचे निर्मूलन करणे हा होता.

**९. *भारतात जातीप्रथा नाहीशी करण्यासाठी कोणी प्रयत्न केले? |ऑक्टोबर १४, जुलै १६|**

**किंवा**

**भारतात जातीप्रथा नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही दोन व्यक्तींची नावे लिहा.**

**|मार्च १५|**

**उत्तर:** भारतात जातीप्रथा नाहीशी करण्यासाठी महात्मा जोतीराव फुले, पेरियार रामस्वामी नायकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन व्यक्तींनी प्रयत्न केले.

**१०. ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक कोणत्या साली प्रसिद्ध झाले?**

**उत्तर:** ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक १८८२ साली प्रसिद्ध झाले.

**११. ताराबाई शिंदे यांचे कुटुंब कोणत्या महापुरुषाचे अनुयायी होते? [जुलै १५]**

**उत्तर:** ताराबाई शिंदे यांचे कुटुंब महात्मा फुले यांचे अनुयायी होते.

**१२. महाराष्ट्रात 'स्त्री-मुक्ती दिन' म्हणून कोणाचा जन्मदिवस साजरा केला जातो?**

**उत्तर:** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस महाराष्ट्रात 'स्त्री-मुक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो.

***१३. स्त्रियांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढावे यासाठी महाराष्ट्र सरकारने काय उपाययोजना केली आहे?**

**उत्तर:** महाराष्ट्र सरकारने सन २०११ पासून स्त्रियांसाठी राखीव जागांचे प्रमाण ५०% केले आहे.

**•१४. सगळ्या जगभरची सरासरी पाहिली, तर राष्ट्रीय कायदेमंडळांमध्ये स्त्रियांचे प्रमाण किती आहे?**

**उत्तर:** सगळ्या जगभरची सरासरी पाहिली, तर राष्ट्रीय कायदेमंडळांमध्ये स्त्रियांचे प्रमाण सतरा टक्क्यांहून कमी आहे.

**•१५. खालील देशांमध्ये राष्ट्रीय कायदेमंडळात स्त्री प्रतिनिधींचे प्रमाण सरासरी किती आहे ते लिहा. युरोपचा उत्तर भाग, उरलेला युरोप व अमेरिका खंड, आशिया व आफ्रिका खंड, भारत.**

**उत्तर:** जगातील देशांमध्ये राष्ट्रीय कायदेमंडळात स्त्री प्रतिनिधींचे प्रमाण:

युरोपचा उत्तर भाग: ४० टक्के

उरलेला युरोप व अमेरिका खंड: २० टक्के

आशिया व आफ्रिका खंड: १६.५ टक्के

भारत: ९ टक्क्यांपेक्षा कमी

## धार्मिक विविधता आणि लोकशाही

---

**१६. भारतात कोणकोणत्या धर्मांचे लोक राहतात?**

**किंवा**

***भारतातील कोणत्याही दोन धर्मांची नावे सांगा.**

**उत्तर:** भारतात हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, पारशी, ज्यू इत्यादी धर्मांचे लोक राहतात.

**१७. धार्मिक विविधतेतून कोणत्या प्रकारचे संबंध निर्माण होऊ शकतात?**

**उत्तर:** धार्मिक विविधतेतून सहिष्णुता, सहकार्य, स्पर्धा व संघर्ष असे विविध प्रकारचे संबंध निर्माण होऊ शकतात.

**१८. धार्मिक स्वातंत्र्य कशाला म्हणतात?**

**उत्तर:** प्रत्येक व्यक्तीला आपआपल्या श्रद्धेप्रमाणे कोणताही धर्म स्वीकारून त्याप्रमाणे पूजाअर्चा किंवा प्रार्थना करण्याची मुभा दिलेली असते, त्यालाच 'धार्मिक स्वातंत्र्य' असे म्हणतात.

## विविधता आणि सत्तेतील वाटा

**१९. विविध समूहांना सत्तेत सामावून घेतल्याने काय होते?**

**उत्तर:** विविध समूहांना सत्तेत सामावून घेतल्याने भिन्न सामाजिक गटांचे संबंध सलोख्याचे राहण्यास हातभार लागतो व लोकशाही व्यवस्था मजबूत होते.

## संघराज्यातील सत्तावाटप

***२०. 'संघराज्य पद्धत' म्हणजे काय? [मार्च १४]**

**उत्तर:** देशांतर्गत प्रदेशांना स्वतंत्रपणे काही अधिकार दिले जातात, या व्यवस्थेला 'संघराज्य पद्धती' असे म्हटले जाते.

## प्र. ३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

### समाजातील वेगळेपणा / विविधता

***१. कोणताच समाज सर्व बाबतीत एकसारखा नसतो.**

**उत्तर: बरोबर**

i. एकाच समाजात विविध वैशिष्ट्ये असणारे लोकसमूह राहतात.

ii. विविध समूहातील लोक वेगवेगळ्या भाषा बोलतात, त्यांचे मूळ प्रदेश वेगवेगळे असतात.

iii. त्यांचे धर्म आणि धार्मिक रिवाज वेगवेगळे असतात. तसेच त्या समूहातील प्रत्येक व्यक्तीचा व्यवसाय, छंद, कौशल्ये, विचारसरणीसुद्धा वेगवेगळी असते.

या विविधतेमुळे कोणताच समाज सर्व बाबतीत एकसारखा नसतो.

**२. प्रत्येक समाज सर्व बाबतीत एकसारखा असतो.**

**[मार्च १४]**

**उत्तर: चूक**

(कारणासाठी प्र. ३. (१) चे उत्तर पाहावे.)

**३. भारतात पूर्णपणे एकसंध समाज आढळतो.**

**[जुलै १५]**

**उत्तर:** i. भारतात पूर्वीपासून भाषा, प्रदेश, धर्म, पंथ यांची विविधता राहिली आहे.

ii. भारतातील विविध समूहातील लोक वेगवेगळ्या भाषा बोलतात, त्यांचे मूळ प्रदेश वेगवेगळे असतात.

iii. त्यांचे धर्म आणि धार्मिक रिवाज वेगवेगळे असतात.

iv. याशिवाय छंद, व्यवसाय किंवा कौशल्ये यांमध्येही विविधता आढळते.

त्यामुळे, भारतात पूर्णपणे एकसंध समाज आढळत नाही.

## विविधता आणि लोकशाही राजकारण

**४. विविधता ही लोकशाहीच्या वाटचालीतला अडथळा आहे ही समजूत आता दृढ होत आहे.**

**उत्तर: चूक**

i. गेल्या साठ-सत्तर वर्षांमध्ये विविधता असलेल्या अनेक समाजांमध्ये लोकशाही अस्तित्वात आली आहे.

ii. भारतासारख्या देशांमध्ये ती यशस्वीपणे राबविली जात आहे.

iii. आता असे मानले जाते, की लोकशाही असेल, तर विविधतेचे संरक्षण तर होतेच; पण लोकशाही असलेला समाज जास्त यशस्वीपणे विविधता हाताळू शकतो.

त्यामुळे, विविधता ही लोकशाहीच्या वाटचालीतला अडथळा आहे ही समजूत आता मागे पडली आहे.

## जातींची विविधता

***५. जातीव्यवस्था ही एक उतरंड आहे.**

**उत्तर: बरोबर**

i. भारतीय समाज हा अनेक जातींचा मिळून बनला आहे.

ii. यामधील काही जाती उच्च तर काही जाती कनिष्ठ मानल्या गेल्या आहेत. काही जातींना अस्पृश्य मानले गेले आहे.

iii. पारंपरिक जातीव्यवस्थेनुसार कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींमध्ये कनिष्ठ व्यवसायाचे, कमी उत्पन्न असलेल्यांचे प्रमाण अधिक आहे. तसेच उच्चशिक्षणाचे प्रमाणही या जातींमध्ये अतिशय कमी आहे.

त्यामुळे, भारतीय जातीव्यवस्था ही एक उतरंड आहे.

## स्त्री-पुरुष विषमता

**६. जगभरातील सर्व समाजांचा असा अनुभव आहे, की स्त्री-पुरुष यांना समाजात समान वागणूक मिळते.**

**उत्तर: चूक**

i. सामाजिक व्यवहार हे स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील विषम संबंधांवर आधारित असतात.

ii. स्त्रिया पुरुषांपेक्षा दुय्यम मानल्या जातात.

iii. कुटुंबात स्त्रियांकडे कमी अधिकार असतात आणि कुटुंबाची मालमत्ता बहुतेक वेळी घरातील पुरुष सभासदांच्या नावेच असते.

iv. कामाचा मोबदला, बढतीच्या संधी यांबाबतीतही पुरुषांना झुकते माप देऊन स्त्रियांवर अन्याय केला जातो. तसेच सार्वजनिक ठिकाणी आणि घरातही स्त्रियांना छळ, हिंसा, अत्याचार यांचा सामना करावा लागतो.

***७. कित्येक देशांमध्ये, लोकशाही अस्तित्वात आली तरी स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता.**

**[मार्च १५]**

**उत्तर: बरोबर**

i. सामाजिक व्यवहार हे स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील विषम संबंधावर आधारित असतात.

ii. स्त्रिया पुरुषांपेक्षा दुय्यम मानल्या गेल्यामुळे लोकशाहीत मिळणारा मतदानाचा मुख्य अधिकार सुरुवातीस फक्त पुरुषांनाच होता.

iii. स्त्रियांच्या चळवळींच्या दडपणातून हळूहळू एकेका देशात स्त्रियांना मताधिकार दिला गेला.

iv. भारताच्या संविधानाने मात्र सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना पहिल्या निवडणुकीपासूनच मताधिकार दिला.

## धार्मिक विविधता आणि लोकशाही

**८. सरकारने सर्व धर्मांना समान वागणूक देणे फार महत्त्वाचे असते.**

**उत्तर: बरोबर**

i. विविध धर्मांचे लोक शांततेने आणि गुण्यागोविंदाने एकत्र राहावेत म्हणून सरकारकडून काही उपाय केले जातात.

ii. त्यांपैकी एक उपाय म्हणजे, सरकारने सर्व धर्मांचा सारखाच आदर केला पाहिजे.

iii. एक धर्म दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे असे मानले, तर धार्मिक समूहांमध्ये स्पर्धा वाढायला हातभार लागू शकतो.

म्हणून, सरकारने सर्व धर्मांना समान वागणूक देणे महत्वाचे आहे.

## प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० शब्दांत लिहा.

**समाजातील वेगळेपणा / विविधता**

**१. एखादद्या व्यक्तीचा समाजातील वेगळेपणा कोणत्या दोन प्रकारांनी ठरविला जातो?**

**उत्तर:** खालील प्रकारांनी व्यक्तीचा समाजातील वेगळेपणा ठरविला जातो:

i. जन्मजात मिळालेली वैशिष्ट्ये: आपले जन्मठिकाण, आपल्या कुटुंबाची भाषा, धर्म यांवरून आपले वेगळेपण निर्माण होते.

ii. समाजातून मिळालेली वैशिष्ट्ये: उदा. छंद, व्यवसाय किंवा कौशल्ये यांच्या आधारे ठरणारा वेगळेपणा.

**२. धर्म आणि श्रद्धा हे घटक एखाद्या व्यक्तीच्या निवडीवर अवलंबून असतात असे का म्हणतात?**

**उत्तर:** i. आपण ज्या कुटुंबात जन्माला येतो त्याचा धर्म हाच आपला धर्म असे बहुतेक वेळा घडते. मात्र आपण वयाने मोठे झाल्यावर आपल्या मनाला पटणारा धर्म स्वीकारू शकतो.

ii. एखादा मनुष्य असेही म्हणू शकतो, की मी निरीश्वरवादी म्हणजेच ईश्वर या कल्पनेवर विश्वास नसलेला आहे.

त्यामुळे, धर्म आणि श्रद्धा हे घटक एखाद्या व्यक्तीच्या निवडीवर अवलंबून असतात.

**३. आपल्या सभोवतालच्या वेगवेगळ्या समूहातील लोकांची आपण कशा प्रकारे वर्गवारी करतो?**

**उत्तर:** आपल्या सभोवतालच्या वेगवेगळ्या समूहातील लोकांची वर्गवारी आपण पुढील घटकांच्या आधारे करतो:

i. लोक ज्या वेगवेगळ्या भाषा बोलतात, त्यांचे मूळ प्रदेश, त्यांचे धर्म आणि धार्मिक रिवाज, त्यांचे व्यवसाय, जीवशास्त्रीय विभागणी.

ii. उदा. लोकांचे त्यांचे व्यवसाय वेगवेगळे असतात. म्हणूनच, आपण त्यांची शेतकरी, व्यापारी, दुकानदार, पांढरपेशे किंवा नोकरदार अशी वर्गवारी करतो.

**४. 'विविधता आणि एकता ही दोन्ही वैशिष्ट्ये एकत्र नांदू शकतात याचे भारत हे ठळक उदाहरण आहे' स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. भारतासारख्या समाजामध्ये पूर्वापार भाषा, प्रदेश, धर्म, पंथ यांची विविधता आहे.

ii. अशी विविधता असूनसुद्धा ऐक्यभावना साकारता येते हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याने दाखवून दिले आहे.

म्हणूनच, विविधता आणि एकता ही दोन्ही वैशिष्ट्ये एकत्र नांदू शकतात याचे भारत हे ठळक उदाहरण मानले जाते.

**५. कोणत्याही एका सामाजिक आधारावर लोकांना संघटित करण्यात कोणती अडचण येते हे उदाहरणासह स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. लोकशाहीत लोकांना आपल्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी एकत्र येण्याची मुभा असते.

ii. लोकशाहीत धर्म, भाषा किंवा प्रदेशाच्या आधारावर राजकीय गट निर्माण होतात.

iii. विशिष्ट भाषेच्या आधारावर लोकांना संघटित करायचे ठरवल्यास येणाऱ्या अडचणी खालील उदाहरणांद्वारे स्पष्ट होतील.

अ. गुजराती भाषा बोलणाऱ्या लोकांना संघटित केल्यास ते भाषा आणि संस्कृतीच्या मुद्द्यावर एकत्र होतील; पण त्यातही बहुविधता असेल.

ब. शहरामध्ये आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या गुजराती भाषिकांमध्ये प्रादेशिकतेच्या मुद्द्यावर विभाजन होईल.

क. तसेच त्यातील गुजराती स्त्रिया गुजराती भाषेच्या मुद्द्यावर संघटित होत असतानाच, स्त्रियांच्या श्रमाबद्दलचा प्रश्न सोडविण्यासाठीही संघटित होतील.

वरील उदाहरणांवरून हे स्पष्ट होते, की अंतर्गत विविधतेमुळे जरी धर्म, भाषा, प्रदेश या आधारावर विभाजन करता येत असले, तरी कोणत्याही एका सामाजिक आधारावर लोकांना संघटित करण्यात अडचण येते.

**६. विविधता असलेल्या समाजात विषमता कशी निर्माण होते?**

उत्तर: i. समाजात विविध भाषा, धर्म व प्रदेशांचे लोक एकत्र राहतात.

ii. कित्येक वेळा कोणतातरी एक समूह आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ कसे आहोत हे सांगतो.

iii. या दृष्टिकोनामुळे विविध समूहांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन विषमता निर्माण होते.

**७. जातींच्या विविधतेमधून विषमतेचा प्रश्न मध्यवर्ती का ठरतो?**

**उत्तर:** i. भारतीय समाज हा अनेक जातींचा बनला आहे. ही जातीव्यवस्था एखाद्या उतरंडीसारखी असून काही जाती उच्च, तर काही कनिष्ठ मानल्या गेल्या आहेत.

ii. तसेच पारंपरिक जातीव्यवस्थेनुसार काही जाती अस्पृश्य मानल्या गेल्या आहेत.

iii. पूर्वी कनिष्ठ मानलेल्या जातींच्या वाट्याला कमी उत्पन्न असलेले कनिष्ठ व्यवसाय आले. तसेच उच्चशिक्षणाचे प्रमाणही या जातींमध्ये कमी आहे.

त्यामुळे, जातींच्या विविधतेमधून विषमतेचा प्रश्न मध्यवर्ती ठरतो.

**८. स्वतंत्र भारताच्या जातीविषयक धोरणाचा मुख्य आधार कोणता?**

**उत्तर:** i. जातीव्यवस्था निर्मूलनासाठी भारतात अनेक जातीविरोधी चळवळी झाल्या.

ii. महात्मा जोतीराव फुले व ड़ॉ. आंबेडकर यांनी जोपर्यंत जाती टिकून आहेत, तोपर्यंत शासकीय धोरणांद्वारे मागास जातींना शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये न्याय्य वाटा मिळाला पाहिजे यावर भर दिला.

iii. त्यांचा हा विचार स्वतंत्र भारताच्या जातीविषयक धोरणाचा मुख्य आधार आहे.

***९. जातीभेदातून निर्माण होणारी विषमता दूर करण्यासाठी लोकशाहीत कोणते मार्ग शोधले गेले?**

**उत्तर:** जातीभेदातून निर्माण होणारी विषमता दूर करण्यासाठी लोकशाहीत खालील मार्ग शोधण्यात आले आहेत:

i. जातीप्रथेच्या विरोधात जे विचार मांडले गेले, ज्या चळवळी झाल्या, त्यातून जातीभेदांच्या दुष्परिणामांबद्दल जागृती निर्माण झाली.

ii. भारत स्वतंत्र झाल्यानंतर काही कायदेशीर तरतुदी अस्तित्वात आल्या. उदा. अस्पृश्यतेवर संविधानाने बंदी घातली. तसेच सरकारने नागरिकांमध्ये जातीच्या आधारे भेदभाव करू नये असे बंधनही घातले.

iii. ज्या जातींमध्ये मागासलेपणाचे प्रमाण जास्त आहे, त्या जातींसाठी काही विशेष तरतुदी केल्या गेल्या.

**१०. ताराबाई शिंदे यांच्या कुटुंबाविषयी थोडक्यात माहिती द्या.**

**उत्तर:** i. ताराबाई शिंदे (१८५०-१९१०) स्त्रीवादी कार्यकर्त्या होत्या.

ii. त्यांचे विदर्भातील बुलढाणा येथे वास्तव्य होते.

iii. त्यांचे कुटुंब हे सत्यशोधकी विचारांचे होते व महात्मा फुले यांचे अनुयायी होते.

**११. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची थोडक्यात माहिती द्या.**

**उत्तर:** i. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (१८३१-१८९७) महात्मा जोतीराव फुले यांच्या पत्नी होत्या.

ii. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती आंदोलनातील अग्रणी, पहिली स्त्री शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून त्यांचे कार्य संस्मरणीय आहे.

iii. विधवा पुनर्विवाहासाठी त्यांनी केलेले कार्य वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते.

**१२. स्त्रियांच्या चळवळींमुळे कोणता बदल घडून आला?**

**उत्तर:** i. स्त्रियांच्या चळवळींमुळे अनेक लोकशाही देशांनी स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठी विविध कायदे केले.

ii. यातून स्त्रियांच्या समान विकासाचा मार्ग मोकळा झाला.

iii. स्त्रियांच्या चळवळींच्या दडपणातून विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून हळूहळू एकेका देशात स्त्रियांना मताधिकार मिळाला.

**१३. भारतात स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा म्हणून कोणते प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर:** i. लोकसभेत आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा असाव्यात असे प्रयत्न भारतात सुरू आहेत.

ii. ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका तसेच जिल्हा परिषदा या ठिकाणी स्त्रियांचे प्रतिनिधित्व असावे म्हणून तेथे स्त्रियांसाठी राखीव जागांची तरतूद केलेली आहे.

iii. महाराष्ट्रात ग्रामपंचायत सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, नगरपालिका नगराध्यक्ष व महानगरपालिकेचे महापौर या सर्व पदांमध्ये स्त्रियांसाठी पन्नास टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत.

**१४. स्त्री-पुरुष विषमतेचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतात कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला जातो?**

**[ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न सोडविण्यासाठी भारतात खालील मार्गांचा अवलंब केला गेला:

i. **स्त्रियांचे संघटन व सामाजिक जागृती :**
स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध स्त्री संघटनांनी आवाज उठविल्यामुळे अनेक चळवळी उभ्या राहिल्या व त्यातून सामाजिक जागृती झाली.

ii. **कायदेशीर तरतुदी :**
भारताच्या संविधानाने प्रौढ स्त्री-पुरुषांना लिंगभेद न करता मतदानाचा अधिकार दिला आहे. तसेच सरकारी नोकरी देताना स्त्रियांबाबत भेदभाव केला जाणार नाही अशी कायदेशीर तरतूद संविधानाने केली आहे.

iii. **विकास योजनांची अंमलबजावणी :**
स्त्रियांच्या हितासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना सरकारमार्फत राबविल्या जातात.

iv. **सत्तेत वाटा मिळावा म्हणून खास तरतुदी :**
स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा म्हणून लोकसभेत आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा असाव्यात असे प्रयत्न सुरू आहेत.

## धार्मिक विविधता आणि लोकशाही

---

***१५. विविध धर्मांचे लोक शांततेने आणि सलोख्याने राहावेत म्हणून कोणते उपाय केले जातात? [जुलै १६]**

**उत्तर:** विविध धर्मांचे लोक शांततेने आणि सलोख्याने राहावेत म्हणून खालील उपाय केले जातात:

i. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या श्रद्धेप्रमाणे कोणताही धर्म स्वीकारून त्याप्रमाणे पूजाअर्चा किंवा प्रार्थना करण्याचे धार्मिक स्वातंत्र्य असावे.

ii. सरकारने सर्व धर्मांच्या लोकांशी नि:पक्षपातीपणे व्यवहार केला पाहिजे. सर्व धर्मांचा सारखाच आदर करणे हा त्याचाच एक भाग आहे. सर्व धर्मांना समान वागणूक देणे फार महत्त्वाचे असते.

iii. संख्येने लहान असणारे धार्मिक समूह मागासलेले राहू नयेत म्हणून त्यांना संरक्षण देऊन त्यांच्या विकासासाठी विशेष काळजी घेतली पाहिजे.

***१६. संघराज्य पद्धतीवर टीप लिहा.** **[मार्च १६]**

**उत्तर:** i. देशांतर्गत भाषिक आणि प्रादेशिक विविधता असली, की प्रदेशांना स्वतंत्रपणे काही अधिकार दिले जातात, या व्यवस्थेला संघराज्य पद्धत असे म्हटले जाते.

ii. संविधानाद्वारेच प्रादेशिक शासनांची निर्मिती केली जाते. संविधानामध्येच केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे अधिकार नमूद केले जातात.

iii. प्रादेशिक शासनांना कोणते व किती अधिकार असावेत याचा निर्णय त्या त्या देशाच्या संविधानात घेतलेला असतो.

iv. प्रादेशिक सत्तावाटप हा विविधता टिकवून लोकशाही पद्धतीने कारभार करण्याचा प्रमुख मार्ग आहे. भारतात आपण अशी संघराज्यपद्धत स्वीकारलेली आहे.

**१७. लोकशाही समाजाला विविधतेच्या संदर्भात कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात?**

**उत्तर:** लोकशाही समाजाला विविधतेच्या संदर्भात खालील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात:

i. विविधता जतन करणे.

ii. विभिन्न समूहांतील परस्परसंबंध सलोख्याचे व समानतेचे राहतील याची काळजी घेणे.

iii. विषमतामूलक वेगळेपणा दूर करणे.

iv. भेदभावविरहित कारभार करणे.

v. भिन्न समूहांना सत्तेत योग्य वाटा मिळवून देणे.

**१८. देशामध्ये विविधता असण्याचे कोणते फायदे आहेत?**

**उत्तर:** देशामध्ये विविधता असण्याचे पुढील फायदे आहेत;

i. विविधतापूर्ण समाज जास्त सहिष्णू बनतो.

ii. विविधतेमुळे जगण्याच्या भिन्न चालीरीती आणि विचार करण्याच्या भिन्न पद्धती यांच्याशी आपला परिचय होतो.

iii. बहुविविधतेमधून समाजामध्ये लोकशाहीला अधिक अनुकूल वातावरण तयार होते.